सातारा, गुरुवार, १३ जुलै २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## 'राष्ट्रीय आर्चरी'साठी क्षितिजा दुधेची निवड



क्षितिजा दुधे

कोरेगाव, ता. १२ : येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील क्षितिजा दुधे हिची नॅशनल आर्चरी चॅंपियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे. उद्यापासून (ता. १४) रविवारअखेर (ता.१६) हैद्राबाद येथे ही स्पर्धा होणार आहे. क्षितिजाचे रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्रिं. डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, क्रीडा शिक्षक प्रा. बाळासाहेब भोसले, प्रा. अरुण पाटील यांनी अभिनंदन केले आहे.